# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३

मेट्रो-३ चे कफ परेड ते सी एस एम टी स्थानक पर्यंतचे भुयारीकरण १००% पूर्ण

भुयारीकरणाचा ३८वा टप्पा पूर्ण

मुंबई, १ जून , २०२१ - मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे( मुं.मे.रे.कॉ) कफ परेड ते सीएसएमटी स्थानकापर्यतचे ऐतिहासिक वारसा इमारती जवळील भुयारीकरण पूर्ण करण्यात आले. पॅकेज-१ अंतर्गत भुयारीकरणाचा ३८ वा टप्पा यशस्वीरीत्या पार पडला. हुतात्मा चौक ते सीएसएमटी हा अप-लाईन मार्गाचा ५५७ मी. भुयारीकरणाचा टप्पा एकूण ४०५ रिंग्जच्या सहाय्याने १४९ दिवसात पूर्ण झाला. या भुयारीकरणाटप्प्यासह पॅकेज-१ मधील भुयारीकरण १००%पूर्ण झाले आहे.

सूर्या-१ या रॉबिन्स बनावटीच्या ड्युएल-मोड हार्ड-रोक टनेल बोअरिंग मशीनद्वारे हे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे .

"आज गाठलेल्या भुयारीकरणाच्या टप्प्यामुळे मेट्रो-३च्या एकूण सात पैकी सहा पॅकेजचे १००% भुयारीकरण पूर्ण झाले आहे. ऐतिहासिक वारसा इमारती नजीक भुयारीकरण करणे हे या प्रकल्पातील अनेक आव्हानांपैकी एक होते. मात्र आमच्या अभियंत्यांनी व कामगारांनी सर्व सुरक्षेविषयक दक्षता घेत हे काम कौशल्यपूर्ण पद्धत्तीने पूर्ण केले याचा मला आनंद वाटतो," असे मुं.मे.रे.कॉचे व्यवस्थापकीय संचालक श्री. रणजित सिंह देओल यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले.

पॅकेज-१ अंतर्गत कफ परेड, विधान भवन, चर्च गेट आणि हुतात्मा चौक या मेट्रो स्थानकांचा समावेश आहे.
पॅकेज-१ च्या भुयारीकरणाचा तपशील:
१) कफ परेड ते विधान भवन (अप लाईन १२२८ मी, डाऊन लाईन १२५४ मी)
२) विधान भवन ते चर्चगेट अप लाईन ४९८ मी, डाऊन लाईन ४८१ मी)
३) चर्चगेट ते हुतात्मा चौक (अप लाईन ६५४ मी)
४) हुतात्मा चौक ते सीएसएमटीअप लाईन (अप लाईन ५५७ मी डाऊन लाईन ५६९मी)

मेट्रो-३ प्रकल्पाचे आतापर्यत एकूण ५२किमी म्हणजेच ९६% भुयारीकरण पूर्ण झाले आहे. (समाप्त)

For further information please contact: –

Vaidehi More
9028543087
vaidehi.more@mmrcl.com

Niti Tamse
8369727364/9664215544
niti.tamse@mmrcl.com